Special Issue, January 2018
International Multilingual Research Journal

# Vidyawarta

®MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

27th January 2018

Shri Samarth Institute of Education, Achalpur Camp

## LATE C.M.KADHI KALA MAHAVIDYALAYA PARATWADA

UGC Sponsored



# One Day National Music Conference

## On Contritution of Audio-Visual Instruments in the Spread and Education of Music

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Organized By
Principal,
**Late C.M.Kadhi Kala Mahavidyalaya, Paratwada**
in Collabration with
**Shri Samarath Institute of Education Adhyapak Vidyalaya**
Achalpur Camp

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759

# || Index ||

1) संगीत प्रसाराची प्रभावी माध्यमे || 16
डॉ. सुजाता जयंत व्यास, औरंगाबाद

2) दृक–श्राव्य यंत्रांचे योगदान — संगीत कलेमध्ये झालेली स्थित्यंतरे (आधुनिक... || 19
प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे, जि. यवतमाळ (महाराष्ट्र)

3) Contribution of Audio-Visual instruments in the spread and || 24
प्रा.सुनील भि. कोल्हे, बार्शिटाकळी जि. अकोला

4) शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारात क- श्राव्य माध्यमांचे योगदान || 26
प्रा.डॉ.नीरज एस.लांडे, अकोला.

5) लोकसंगीताच्या प्रचार व उन्नती मध्ये श्राव्य व दृक — श्राव्य माध्यमाचे योगदान. || 28
श्रीमती कल्पना जैन, मुंबई.

6) संगीताच्या प्रचार आणि प्रसारा करीता रेडिओ, दुरदर्शनचे योगदान || 31
प्रा. राहुल एम. भोरे, भंडारा.

7) लोकसंगीताच्या प्रचार आणि उन्नतीकरिता दृक आणि श्राव्य माध्यमाचे योगदान || 33
शरद पुंडलिक गजभिये, जिल्हा भंडारा

8) शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी दृक- श्राव्य माध्यमांचे योगदान || 35
प्रा.डॉ. साधना मोहोड. पुसद

9) "शास्त्रीय संगीतातील परिवर्तनशीलतेमध्ये दृकश्राव्य माध्यमांचे योगदान" || 38
डॉ. वैखरी वझलवार, एल. ए. डी. कॉलेज

10) शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रगतीसाठी दृकश्राव्य माध्यमाचे योगदान || 40
Prof. Dr. Shirish Kadu, Akola

11) संगीताच्या प्रचार प्रसारातील रेडिओची संगीत निती || 42
प्रा.डॉ. सुधीर ब. मोहोड, अमरावती

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science Aurangabad

गायकीला व ते नाव धारण करण्यात आले. विभूतींच्या गुणामुळे घराण्याच्या नावाने ओळखली जाऊ लागली व लोकाभिमुख झाली.

केवळ मौखिक स्वरूपात पिढ्यांमध्ये अंगिकारलेली गायकी व त्याचे नामकरण म्हणजे त्या घराण्याची गायकी असा ठसा रसिक समाजात होऊ लागला. पुढील दोन–तीन शतकात यातील तोच तो पणा केवळ न टिकविता इतर घराण्याच्या गायकीतील नाविन्याचा भाग विविध घराण्यात होताना आढळू लागला. परिणामी कलेच्या लोकाश्रयाची मर्यादा आणखीच विस्तारित होऊ लागली. काळाच्या ओघात संगीत कला म्हणजे केवळ शास्त्रीय संगीत नव्हे तर सुगम संगीत, भक्तीसंगीत, लोकसंगीत अशा उपशाखांनी संगीतातील आस्वादन होऊ लागले. ऐतिहासिक घडामोडीमुळे समाजाला व्यवस्था लावण्याचे महत कार्य या शाखांद्वारे साधले जाऊ लागले. विविध उत्सवादी प्रसंगी संगीत जलसे हीच केवळ संगीत रसिकांसाठी श्रवणाची पर्वणी ठरली होती.

शास्त्रीय संगीतातील घराणेदार गायन वादनाबरोबर संगीताच्या उपशाखांमुळे संगीताच्या स्वरूपात बहुविध पणा आला. याच कलात उदयास आलेली आकाशवाणी केंद्रे ज्यामुळे संगीताच्या वेगवेगळया रूपाची ओळख समाजात होऊ लागली. केवळ समारोहातून संगीत ऐकण्याचा लाभ घेतला जाई. त्याची जागा आकाशवाणीच्या केंद्रांनी घेतली. रागगायनाचे स्वरूप, रागगायनातून प्रस्तुत केल्या जाणाऱ्या शैली, समयानुसार राग प्रस्तुती, विविध घराण्यांची ओळख म्हणून गायकीतील विविधता ही आकाशवाणी केंद्राने लोकांपर्यंत पोहोचविली व शास्त्रीय गायनाविषयी जनमानसात आदर व प्रसार अशा दुहेरी कार्याची सिध्दता केली. सुगमसंगीत, प्रादेशिक संगीत या आधारे संगीतातील सुगमरूप लोकांसमोर आकाशवाणीने प्रसारित केले.

आकाशवाणीच्या प्रसारण व त्यानंतर त्याचे संग्रहण व पुनःप्रसारण यातून दिग्गज कलाकारांच्या गान वादनाची जाण रसिक समाजात होऊ लागली. कलेच्या बाबतीत कोणतेही नवे विचार स्विकारण्याची वृत्ती त्याकाळातील कलावंतांमध्ये नव्हती. याच काळात HMV (His Master Voice) कंपनीने रेकॉर्डींग या तंत्रज्ञानाने गायनवादन संग्रहीत करण्याची नवी पध्दत अमलात आणली. केवळ दरबारात किंवा देवालयात होणारी संगीताची प्रस्तुती ही पुढे रसिक, साधक अभ्यासकांच्या घरी रेकॉर्डस्, स्पूल व कॅसेटसूच्या माध्यमाने पोहोचली. महाराष्ट्रात संगीत कलेच्या प्रसारासाठी नाटक व चित्रपट या दोन माध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. संगीत कलेला समाजात उच्चस्थान प्राप्त होण्यासाठी देवादिकांच्या कथनांवर आधारित नाट्यगीतांची रचना व त्याचे शास्त्रीय संगीतातील रागदारीच्या आधारे प्रस्तुतीकरण हयाचा तत्कालीन जनमानसावर योगय प्रभाव पडला. नाट्यगीत इतके प्रभावी ठरले की सर्वसामान्य रसिकांमध्ये रागदारीची ओळख ही नाट्यपदांद्वारे होऊ लागली व शास्त्रीय संगीताचे जनमानसातील स्थान उंचावले गेल्या शतकातील संगीताच्या प्रसाराच्या या माध्यमाने आज त्या नाटकांना पुन: प्रदर्शित करण्याचा किंवा चित्रपटातून दिग्दर्शित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे व नव्या पिढीला त्या संगीताला जतन करण्याचा संदेश पोहचवला आहे.

बोल चित्रपटाला प्रभावी करण्यासाठी पार्श्वसंगीताचे आयोजन या नव्या संकल्पनेचे रसिकमनाने सहर्ष स्वागत केले व बोलण्याबरोबर गीत प्रस्तुती हा प्रयोग देखील यशस्वी ठरला. चित्रपट संगीताचे आयोजन करणे ही कलाकारांसाठी संगीताला विकसित करण्याची नवी प्रायोगिक संधी अधिकाधिक वृध्दिंगत झाल्याचे दिसते. गेल्या १०० वर्षातील चित्रपट संगीताचा ओझरता संगीत प्रवाह चक्षु:पटलासमोर आणला तर असे लक्षात येते की अनेक मान्यवर कलाकारांनी चित्रपटाला संगीताचे नियोजन समर्थपणे केले आहे. रागदारी संगीताची ओळख, समानता असणाऱ्या रागांचे एकत्र सादरीकरण, समयानुकूल व चित्रपटाच्या भावानुकुल संगीताचे नियोजन करून नवनवीन संगीत कलाकृती तयार केल्या आहेत व त्या कलाकृती म्हणजे शतकानुशतके संगीत रसिकांना आस्वादनाची संजीवनी दिली आहे असे म्हणता येईल. याच काळात दूरदर्शन या प्रसार माध्यमाने तर प्रत्येक व्यक्तीतील कलाकार हा जागृत केला आहे. वीस पंचवीस वर्षापूर्वी एक दोन दूरचित्र वाहिन्यांनी त्या काळातील दिग्गज कलाकारांच्या मुलाखती, शास्त्रीय

संगीतातील शास्त्र व कलाप्रस्तुती यांची उकल ही शिक्षित संगीत समाजापर्यंत पोहचवली. संगीताचे सखोल मर्म जाणण्यास असे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरले होते.

तंत्रज्ञानाच्या विकासात नव्या विज्ञानाचे नवीन प्रयोग, त्याची उपयुक्तता ही गेल्या पाच सहा दशकात इतक्या जलद वेगाने झाली आहे की संगीत हे अबाल वृद्ध, तरूण, बालक सर्वांच्या आवडीचा, मनोरंजनाचा अविभाज्य भाग बनला आहे. असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

गेल्या दशकापासून प्रसार माध्यमांना व्यावसायिकतेचे रूप आले आहे. त्यातील कलेचे रूप प्राधान्याने विचारात घेतले तर तांत्रिक युगाने संगीत कलेच्या विकासाला व प्रसाराला विस्तीर्ण असे दालन दिले आहे. संगणकाचा संगीतासाठी प्रयोग हे वरदानच ठरले आहे. संगीत साधक, अभ्यासक, रसिक सर्वांसाठीच संगणकावरील नवनवीन प्रयोग पूर्णपणे यशस्वी ठरले आहेत. संगणकाचा संगीत कलेसाठी प्रयोग हा अत्यंत भावपूर्ण विषय बनला आहे. संगणकाच्या माध्यमातून शंभर वर्ष जुने कलावंतांचे फोटो, रेकॉर्डींग आजही अपेक्षित परिणाम साधताना आढळतात. संगणकाच्या सहाय्याने संगीतातील कोणत्याही प्रकारच्या अभ्यासकाला स्वतःला प्रगत करणे शक्य झाले आहे.

संगणकातील आंतरजालाद्वारे संपूर्ण जगातील नवनवीन संशोधन, इतिहास, विज्ञान इ. विषयाची माहिती अवगत होणे एवढाच काय तो संगणकाबद्दल समज होता. पण वैश्विकरणाचा विचार व संगणकातील दिवसेंदिवस प्रगत होणारे तंत्रज्ञान याचा प्रभावसंगीत कलेच्या प्रसारावर अतिशय झपाटयाने झाल्याचे आढळते. विविध प्रकारची सांगीतिक माहितीच नव्हे तर जुन्या मान्यवर गायकांचे गायन संगणकाद्वारे संग्रही करणे शक्य झाले आहे. रेकॉर्डींगचे नवे तंत्रज्ञान कलावंतातील गुण विशिष्टांना प्राधान्य देणारे ठरते आहे. या तंत्रज्ञानाला आत्मसात करून आज युवा पिढी स्वतःच्या विकासाची नवनवीन साधने प्रगत करतांना आढळतात. पूर्वी गायक कलाकार त्यांची मेहनतीची साधना व लोकांसमोर प्रस्तुती असा पूरक संवाद असे. पण संगणकाद्वारे आज मोठमोठया कलावंतांची प्रस्तुती जणू काही समोर कलावंत बसल्या आहे या प्रकारे बघता येतो व त्या कलेचा आस्वाद घेता येतो. संगणकाचेच छोटे स्वरूप म्हणजे आज प्रत्येक व्यक्तीच्या हातात आढळणारा CellPhone होय. व्यक्ती तरूण असो की वृध्द, श्रीमंत असो वा गरीब, ऑफिसर असो वा नोकर प्रत्येकाच्या CellPhone मध्ये संगीताचे विविध कार्यक्रम साठवलेले आढळतात. डॉ. अशोक रानडे यांनी संगीतातील सांगितलेल्या कोटीपैकी जनसंगीत, चित्रपटसंगीत, भक्तीसंगीत हे बहुतेकांच्या श्रवणातील प्राधान्याने संगीत होय. हे संगीत चिरस्थायी आनंद देणारे नसले तरी आपापल्या वैयक्तिक व्यवसायाने स्वरूप सांभाळीत या संगीतातून 'आनंदवन' हे नक्कीच साधले. शास्त्रीय संगीताच्या प्रसारात अभ्यासकाने श्रवण अभ्यास करावा एवढी उपलब्धी आज या प्रसार माध्यमाने केली आहे. मोठमोठया कलावंताच्या प्रस्तुतीतून कलात्मक सर्जनशील विचारांची प्रगल्भता अभिप्रायातून लगेच दर्शविले जाते. तर छोटया छोटया कलाकारांच्या संगणकाद्वारे प्रसारित होणाऱ्या प्रस्तुतीला अभिप्राय देताना त्याला प्रोत्साहित करणे हा उद्देश्य सफल होताना दिसतो. मानसिक रूग्ण व विविध शल्यचिकित्सक हॉस्पिटलमध्ये संगीत श्रवणातून रूग्णांवर इलाज हा प्रयत्न संगणकाच्या संगीत प्रसार माध्यमाद्वारे सफल होताना आढळतो आहे.

आज विविध प्रसार माध्यमे उपलब्ध झाली असली तरी संगीत कलेच्या उपासकाला नव्या तंत्रज्ञानाबरोबर वैयक्तिक साधने, मेहनत, चिकाटी या शिवाय प्रसार माध्यमांचा प्रयोग सफल करणारा नाही हे खरे.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

संदर्भ पुस्तके

१. आधुनिक कालमे संगीत — डॉ. हुकुम चंद
२. आस्वादक संगीत समीक्षा — श्रीरंग संगोराम
३. संगीत विचार — डॉ. अशोक रानडे
४. संगीत शास्त्र विज्ञान भाग २ — डॉ. सुस्मिता विडेकर

□□□